स्थापना 1987

।। श्री दत्त प्रसन्न ।।

# दत्तसेवा

## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

पश्चिम उपनगरातील अग्रेसर पतपेढी

रजि. नं. बी.ओ.एम./डब्ल्यू.पी./आर.एस.आर./(सी.आर.)/११०२/८७.



31 वा

## वार्षिक अहवाल 2017-2018

**328**
कोटी व्यवसाय पुर्ती
पुढील लक्ष्य
**500**
कोटी...

प्रधान कार्यालय : 1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी अग्निशमन केंद्रासमोर, मालाड (पश्चिम), मुंबई-95.
फोन नं. : 2888 9027/8108160101/113 | Website : www.dattaseva.com

# संचालक मंडळ


श्री. आनंदराव ई. माईंगडे
संस्थापक/अध्यक्ष


श्री. गोपीनाथ म. राणे
उपाध्यक्ष



श्री. विनय गो. जोशी
संचालक


श्री. जयवंत ग. पाटील
संचालक


श्री. प्रभाकर ज. धुरी
संचालक


श्री. प्रदिप नि. कदम
संचालक


श्री. अरविंद रा. कोक
संचालक



श्री. भार्गवदास रा. जाधव
संचालक


श्री. वसंत कृ. पाटील
संचालक


श्रीम. शिवगामी उ. पिल्लई
संचालिका


कु. स्नेहा आ. माईंगडे
संचालिका


श्री. प्रभाकर गो. देसाई
तज्ज्ञ संचालक


ॲड. जयसिंग एस. सुर्यवंशी
तज्ज्ञ संचालक


श्री. हरी के. पाटील
मुख्यव्यवस्थापक


सौ. अर्चना आ. माईंगडे
उप मुख्यव्यवस्थापक

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

## 31 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्या. मुंबई या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची 31 वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. 01/09/2018 रोजी सकाळी 10.00 वाजता श्री श्याम सत्संग भवन, महावीर नगर जवळ, एकता नगर, लिंक रोड, ब्लू आर्च बिल्डींग मागे, कांदिवली (प.), मुंबई** – 400 067. येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

## सभेपुढील विषय

1) दि. 29/07/2017 रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक 31 मार्च 2018 पर्यंतच्या कार्याचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
3) सन 2017-2018 या सालचा अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
4) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
5) सन 2018-2019 करिता अंतर्गत व कर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
6) सन 2018-2019 करिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
7) सन 2017-2018 मधील अंदाजपत्रकातील वाढीव झालेल्या रक्कमेस मान्यता देणे व सन 2018-2019 सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
8) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
9) नवीन शाखा सुरु करण्याबाबत विचार विनीमय करणे.
10) जागा खरेदी बाबत चर्चा करणे.
11) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती त्यांनी विनंती केल्यानुसार क्षमापित करणे.
12) पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
13) सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
14) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सही/-
**श्री. हरी पाटील**
मुख्यव्यवस्थापक

स्थळ : मुंबई
दिनांक : 13/08/2018

## विशेष सुचना

1. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी वरील विषयांवर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
2. ज्या सभासदांना ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकाबाबत लेखी सुचना करावयाच्या असल्यास सभेच्या चार दिवस अगोदर कार्यालयात आणून द्याव्यात. ऐनवेळी आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
3. सभासदांनी आपल्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यातील बदलासंबंधी तसेच फोन नंबरबाबत संस्थेस त्वरीत कळवावे.
4. ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेऊन जावेत.

संचालक मंडळ

## अध्यक्षांचे
# मनोगत....



**सन्माननीय सभासद बंधू भगिनी यांस सस्नेह नमस्कार.....**

दत्तसेवा सहकारी पतपेढीचा 31 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक आपणा समोर सादर करताना मला आनंद होत आहे. संस्थेच्या प्रगतीचा दररोज आढावा घेता यावा या करिता सर्व शाखाधिकारी, विभागीय अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचेकरीता संस्थेच्या प्रधान कार्यालयात सुसज्ज असा संगणकीकृत कॉन्फरन्स कक्ष तयार करण्यात आला आहे. या ठिकाणी संस्थेच्या प्रगतीबाबत सर्व कर्मचारी यांना प्रोजेक्टरद्वारे दर्जेदार प्रशिक्षण व्यवस्था केली आहे. यामुळे संस्थेच्या कामामध्ये अहवाल वर्षात गतिमानता आलेली आहे.

केंद्र सरकारच्या नोटबंदी व जी.एस.टी. कायद्याने व्यवहारावर अनेक बंधने आली. बँकींग व्यवसायाची समीकरणे बदलली परंतु संस्थेने या काळातही आपले कामकाज यशस्वीरित्या करुन मार्च 2018 अखेर 264 कोटी खेळते भागभांडवल व रु. 328 कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा यशस्वी केला आहे. यामध्ये संस्थेचे अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी,सभासद व ठेवीदार यांचे मोलाचे योगदान आहे हे नमुद करताना आनंद होत आहे. संस्थेने शासनाच्या जी.एस.टी. कायद्याचा अवलंब करत दि. 31 मार्च 2018 अखेर 5,76,063 रुपये जी.एस.टी. कर भरणा केला आहे.

संस्थेच्या ग्रामीण भागात कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात 3 शाखा कार्यरत असून त्या भागातील सभासद, हितचिंतक व ग्रामस्थांकरीता तुरुकवाडी शाखेजवळ अत्याधुनिक प्युरीफायर पाण्याच्या मशिनचे लोकार्पण केले आहे. याचा परिसरातील नागरिकांना लाभ होत आहे. संस्थेचे कामकाज हे संपुर्णतः संगणकीकृत आहे. कोअर बँकींग, मोबाईल ॲपवर दैनंदिन ठेव जमा करणे सुरु असून यामुळे सभासदांना आपला व्यवहार मोबाईलवर पाहता येणे शक्य झाले आहे. भविष्यात सभासदांसाठी ए.टी.एम. सुविधा सुरु करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या उल्लेखनीय प्रगतीबाबत सन 2017 चा 'बँको पुरस्कार' जिवनधारा फाऊंडेशन यांच्या वतीने ''मुंबई सहकार भुषण पुरस्कार'' तसेच शांताराम कारंडे फॅन्स फाऊंडेशन वतीने सहकार गौरव पुरस्कार संस्थेस प्राप्त झाला आहे. आज संस्थेच्या 18 शाखांचा कारभार, प्रधानकार्यालयाच्या नियंत्रणाखाली सुरु असून दैनंदिन कामकाजाचा नियमित आढावा घेतला जातो. याकरिता प्रशिक्षीत कर्मचारी व अधिकारी वर्ग सातत्याने कार्यरत असतो. त्यांच्या मेहनतीमुळे व संचालकांनी केलेल्या सहकार्यामुळे संस्था आपली यशस्वी वाटचाल करीत आहे. संस्थेच्या पुढील वाटचालीस असेच सहकार्य व मार्गदर्शन, सभासद, हितचिंतक, ठेवीदार व कर्मचारी यांचेकडून मिळावे हि ईश्वरचरणी प्रार्थना !

**मा. श्री. आनंदराव माईंगडे**
संस्थापक / अध्यक्ष

## अहवाल सालातील विशेष उल्लेखनीय कार्य

**खेळते भागभांडवल :-**

संस्थेने सभासदांना दिलेली दर्जेदार सेवा, सभासदांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे संस्थेने 31 मार्च 2018 अखेर 264 कोटी खेळते भागभांडवलाचा टप्पा पूर्ण केला आहे. तर 328 कोटी संमिश्र व्यवसाय पूर्तता केली आहे, ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने विशेष अभिनंदनीय आहे.

**स्वतःच्या मालकीची शाखा कार्यालये :-**

संस्थेचे प्रधान कार्यालय व 18 शाखा सभासदांच्या सेवेशी कार्यरत आहेत. त्यापैकी मालवणी, गोरेगांव(प.), गोराई(प.), जोगेश्वरी (प.), कांदिवली (प.), जोगेश्वरी (पू.), मालाड (पू.), नायगाव(प.), दहिसर(पु.), म्हाडा मालवणी, भांडुप (प.), विरार (पू.), घाटकोपर या 13 शाखा संस्थेच्या स्वमालकीच्या असून त्याची किंमत आजच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे 6 कोटीपेक्षा जास्त आहे.

**मान्यवरांच्या भेटी :-**

अहवाल सालात संस्थेच्या प्रधान कार्यालयाबरोबर शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करून माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे व प्रगतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांचे आभारी आहे.

**शिक्षण व प्रशिक्षण :-**

सहकार खात्याच्या नियमानुसार पतसंस्थेच्या संचालक व कर्मचारी यांनी 3 दिवस प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. यानुसार संस्थेने खालील प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला असून सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी यांना १००% प्रशिक्षण दिले आहे.

1) दि. 24/03/2018 रोजी मुंबई सहकारी बोर्डाच्या वतीने बोरिवली (पुर्व) येथे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमांस संस्थेचे २५ प्रतिनिधी उपस्थित होते.
2) दि. 23/12/2017 रोजी गोरेगाव (पुर्व) येथे सहकार भारती व पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात संस्थेचे १५ कर्मचारी उपस्थित होते.
3) दि. 16/09/2017 रोजी महिला आधार भवन कांदिवली (प.) येथे सहकार भारती व पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशनच्या प्रशिक्षण कार्यक्रमांस संस्थेचे २५ प्रतिनिधी उपस्थित होते.
4) दि. 03/12/2017 रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचे वतीने तुरुकवाडी कोल्हापूर येथे सहकार मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमास इतर सहकारी संस्था व संस्थेचे मिळून एकूण १२५ प्रतिनिधी उपस्थित होते.
5) दि. 16/07/2017 ते 17/07/2017 या कालावधीमध्ये कार्ला लोणावळा येथे मुंबई सहकारी बोर्डाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास संस्थेचे 2 प्रतिनिधी उपस्थित होते.
6) दि. 15/04/2017 रोजी तुरुकवाडी (कोल्हापूर) येथे कर्मचारी प्रशिक्षण व इतर सहकारी संस्थांचा मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमांस विविध संस्थांचे 95 प्रतिनिधी उपस्थित होते.
7) बँको या मासिकाच्या वतीने दि. 12/02/2018 ते 13/02/2018 या कालावधीमध्ये लोणावळा येथील प्रशिक्षण कार्यक्रमांस दोन प्रतिनिधी उपस्थित होते.
8) पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व सहकार भारती आयोजित दि. 04/02/2018 ते 05/02/2018 या कालावधीमध्ये अलिबाग येथील प्रशिक्षण कार्यक्रमास संस्थेचे 12 प्रतिनिधी उपस्थित होते

**सभासद :-**

मागील अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या 35414 होती. अहवाल वर्षात 6828 नवीन सभासद झाले. त्यामधील 647 सभासदांनी अन्य कारणास्तव राजीनामे दिले. अहवाल वर्ष अखेरीस 41595 कायम सभासद संस्थेच्या पटावर आहेत.

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

**भाग भांडवल :-**

आपल्या संस्थेचे अधिकृत भागभांडवल ₹ 20 कोटी असून मागील अहवाल वर्षाअखेर संस्थेची भागभांडवल रक्कम ₹ 8,64,18,900/- होती. अहवाल वर्षामध्ये नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून (कर्ज वाटपाच्या प्रमाणात) वसुल झाल्याने भाग रक्कम ₹ 2,15,09,200/- जमा झाली आहे. काही सभासद स्थलांतरित झाल्याने व राजीनामा दिल्याने ₹ 57,39,600/- चे भाग परत देण्यात आले. अहवाल वर्षाअखेर शिल्लक भागभांडवल ₹ 10,21,88,500/- आहे.

**राखीव व अन्य निधी :-**

अहवाल वर्षाच्या सुरुवातीला राखीव व अन्य निधी रक्कम ₹ 16,76,95,879.85 होता. अहवाल साली ₹ 6,93,55,451.00 इतक्या तरतूदी करण्यात आल्या असुन 31 मार्च 2018 अखेरीस एकूण ₹ 23,70,51,330.85 इतका निधी जमा आहे.

**गुंतवणूक :-**

अहवाल सालाच्या सुरूवातीस अतिरिक्त व राखीव निधी व तरलतेपोटी ₹ 72,29,09,593.15 विविध बँकेमध्ये गुंतवणूक केली होती. संस्थेच्या विविध ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व सहकार आयुक्तांनी लागू केलेले सी. डी. रेशोचे प्रमाण व तरलता गुंतवणूकीचे निकष विचारात घेऊन ठेवीदारांची रक्कम आवश्यकतेप्रमाणे ठेवीदारांना त्वरीत परत करता यावी या उद्देशाने अहवाल सालात संस्थेने एकूण ₹ 58,50,96,385.15 एवढी गुंतवणूक विविध बँकेत केलेली आहे.

**ऑडीट वर्ग :-**

संस्थेचे सन 2017-2018 या अहवाल वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण एस. बी. सणस ॲण्ड असोसिएट्स प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केले. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दिक्षीत दत्तात्रय ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून संस्थेस वैधानिक लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग मिळाला आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण 20 सभा झाल्या. या सभांना सर्व संचालक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते. प्रत्येक सभेत संस्थेचे हित व प्रगतीचा विचार करून सर्वानुमते निर्णय घेण्यात आले आहेत.

**कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, सिंधुदूर्ग, पालघर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब :-**

बँकींग क्षेत्रात सर्वच होत असलेला इंटरनेटचा वापर लक्षात घेता संस्थेने मोबाईलद्वारे डेली कलेक्शन करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली असून लवकरच सर्व दैनंदिन ठेवीदारांना त्याची जमा झालेली व एकूण जमा रकमेची माहिती वेळच्या वेळी मिळणार आहे.

**कर्मचारी वर्ग :-**

संस्थेतील अंतर्गत कामकाजाची पूर्तता करण्याकरीता वरिष्ठ अधिकारी, विभागीय अधिकारी, शाखाधिकारी व वरिष्ठ लिपिक, वसुली अधिकारी, रोखपाल, लिपिक, शिपाई असे एकूण 91 कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कामाची विभागणी करून जबाबदारी देण्यात आल्यामुळे संस्थेच्या अंतर्गत कामकाजाचा दर्जा उंचावला आहे.

**ठेव संकलन प्रतिनिधी :-**

संस्थेचा प्रचार हा ठेव संकलन प्रतिनिधीद्वारे होत असतो व घरपोच सेवा देण्याचे काम ते करतात. अहवाल सालात संस्थेच्या विविध शाखेत 130 दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये व संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**संचालक व त्यांचे नातेवाईक कर्ज तपशिल :**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 75 (2) नुसार संचालक आणि त्यांच्या नातलगांच्या नांवे ₹ 60,45,953.00 कर्ज शिल्लक असून 31 मार्च 2018 अखेर संचालक अथवा नातेवाईक यांची कर्जे थकित नाहीत.

**कर्ज वसुली अधिकार :**

मा. अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी संस्थेचे मुख्य व्यवस्थापक श्री. हरी पाटील, मुख्य वसुली अधिकारी श्री. नंदकुमार पाटील, शाखाधिकारी श्री. शशिकांत पाटील यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 156 चे नियम 107 नुसार शासकीय वसुली अधिकाऱ्याचे अधिकार प्रदान केले आहेत. ज्या कर्जदारांवर कोर्ट कारवाई करून वसुली दाखला घेण्यात आलेला आहे. त्या सभासदांनी आपले थकीत कर्ज भरावे अन्यथा त्यांच्यावर जप्ती, पगारकपात इ. कायदेशीर कारवाई होऊ शकते. याबाबत आपल्या काही अडचणी असल्यास कार्यालयात हजर राहून अधिकारी अथवा संचालक मंडळा समोर समक्ष चर्चा करावी ही विनंती.

**सभासद ठेवी :**

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्था ठेवी वाढविणेबाबत वेगवेगळे उपक्रम राबवित असते. यामुळे अहवाल सालात ठेवीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. संस्थेकडे मागील वर्षाअखेर विविध ठेव खात्यामध्ये रक्कम ₹ 152.68 कोटी शिल्लक होती. अहवाल वर्षात ₹ 299.57 कोटी ठेवी पोटी जमा झाले असून मुदत संपल्यानंतर सभासदांना ₹ 285.28 कोटी च्या ठेवी परत केल्या असून अहवाल वर्षाअखेर ₹ 166.97 कोटी ठेवी शिल्लक आहेत. गतवर्षाच्या तुलनेत अहवाल सालामध्ये ठेवीमध्ये 9.36% वाढ झालेली आहे. त्याची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

**✲ ठेव प्रगती तक्ता ✲**

(₹. कोटीत)

| अ. क्र. | ठेवीचा प्रकार | 31 मार्च 2017 अखेर शिल्लक जमा | अहवाल वर्षातील जमा | अहवाल वर्षातील परत दिलेली रक्कम | 31 मार्च 2018 अखेर शिल्लक | ठेवीमध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बचत ठेव | 9.35 | 140.53 | 140.37 | 9.51 | 1.71 |
| 2 | मुदत ठेव | 34.71 | 35.53 | 28.72 | 41.52 | 19.62 |
| 3 | दामदुप्पट ठेव | 12.58 | 4.45 | 2.86 | 14.17 | 12.64 |
| 4 | आवर्त ठेवी | 1.38 | 1.69 | 1.47 | 1.60 | 15.94 |
| 5 | सक्तीची बचत ठेव | 1.21 | 0.62 | 0.39 | 1.44 | 19.01 |
| 6 | लखपती ठेव | 0.43 | 0.11 | 0.07 | 0.47 | 9.30 |
| 7 | त्रिमुर्ती दैनंदिन ठेव | 22.28 | 66.69 | 63.85 | 25.12 | 12.75 |
| 8 | दाम तिप्पट ठेव | 0.37 | 0.19 | 0.04 | 0.52 | 40.54 |
| 9 | मासिक लखपती ठेव | 0.98 | 0.85 | 0.79 | 1.04 | 6.12 |
| 10 | दाम चौपट ठेव | 3.54 | 0.79 | 0.15 | 4.18 | 18.08 |
| 11 | मासिक व्याज परतावा | 20.13 | 4.00 | 4.93 | 19.20 | -4.62 |
| 12 | दैनंदिन प्रतिनिधी ठेव | 1.17 | 0.32 | 0.04 | 1.45 | 23.93 |
| 13 | दिपलक्ष्मी ठेव | 18.26 | 11.93 | 10.62 | 19.57 | 7.17 |
| 14 | मंगलमुर्ती ठेव | 5.44 | 7.59 | 4.08 | 8.95 | 64.52 |
| 15 | महालक्ष्मी ठेव | 11.19 | 3.60 | 2.00 | 12.79 | 14.30 |
| 16 | वसंतपंचमी ठेव | 4.10 | 0.68 | 1.68 | 3.10 | -24.39 |
| 17 | संचय ठेव | 0.12 | 0.28 | 0.22 | 0.18 | 50.00 |
| 18 | कॉल ठेव | 5.44 | 18.52 | 22.98 | 0.98 | -81.99 |
| 19 | उत्कर्ष ठेव | 0.00 | 1.20 | 0.02 | 1.18 | 0.00 |
| | एकूण | 152.68 | 299.57 | 285.28 | 166.97 | 9.36 |

**कर्ज तपशील :-**

वित्तीय संस्थांमधील वाढत्या स्पर्धेमुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी सभासदांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सभासद राजा आहे. परिणामी कर्जाची मागणी दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. तथापि सभासदांच्या अधिकाधिक आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थेने विविध कर्ज योजना सुरू केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे.

मागील वर्षाअखेर संस्थेकडे एकूण ₹ 130.55 कोटी कर्ज येणे शिल्लक होते. अहवाल वर्षात संस्थेने ₹ 98.99कोटी कर्ज वाटप केले. अहवाल वर्षात ₹ 67.84 कोटी कर्ज वसूल झाले आहे. अहवाल वर्षाअखेर सभासदाकडून ₹ 161.70 कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये 23.86% वाढ झालेली आहे.

## ✻ कर्ज तपशील तक्ता (तुलनात्मक आकडेवारी) ✻

(₹. कोटीत)

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | 31 मार्च 2017 अखेर शिल्लक | अहवाल वर्षातील कर्ज वसुल | अहवाल वर्षातील कर्ज वाटप | 31 मार्च 2018 अखेर कर्ज शिल्लक | कर्जामध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वैयक्तिक कर्ज | 7.06 | 3.28 | 6.15 | 9.93 | 40.65 |
| 2. | वाहन तारण कर्ज | 0.68 | 1.57 | 11.20 | 10.31 | 1416.18 |
| 3. | ठेव तारण कर्ज | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 4. | दिर्घ मुदत कर्ज | 79.18 | 18.98 | 31.76 | 91.96 | 16.14 |
| 5. | तात्काळ कर्ज | 0.03 | 0.03 | 0.03 | 0.03 | 0.00 |
| 6. | इतर तारण कर्ज | 0.93 | 0.11 | 0.12 | 0.94 | 1.08 |
| 7. | त्रिमुर्ती दैनंदिन कर्ज | 2.37 | 14.58 | 15.42 | 3.21 | 35.44 |
| 8. | सोने तारण कर्ज | 3.18 | 5.90 | 6.54 | 3.82 | 20.13 |
| 9. | कर्म. गृह तारण कर्ज | 3.39 | 1.31 | 1.74 | 3.82 | 12.68 |
| 10. | कर्मचारी कर्ज (शैक्षणिक) | 0.03 | 0.02 | 0.16 | 0.17 | 466.67 |
| 11. | कर्म. वाहन तारण कर्ज | 0.04 | 0.02 | 0.03 | 0.05 | 25.00 |
| 12. | गृहतारण कर्ज | 22.52 | 5.04 | 9.93 | 27.41 | 21.71 |
| 13. | दामदुप्पट ठेव कर्ज | 1.44 | 2.45 | 1.93 | 0.92 | -36.11 |
| 14. | मुदत ठेव कर्ज | 0.86 | 2.93 | 3.49 | 1.42 | 65.12 |
| 15. | लखपती ठेव कर्ज | 0.05 | 0.06 | 0.05 | 0.04 | -20.00 |
| 16. | दामतिप्पट ठेव कर्ज | 0.04 | 0.01 | 0.03 | 0.06 | 50.00 |
| 17. | दामचौपट ठेव कर्ज | 0.60 | 0.69 | 0.85 | 0.76 | 26.67 |
| 18. | दिपलक्ष्मी ठेव कर्ज | 0.62 | 1.35 | 1.26 | 0.53 | -14.52 |
| 19. | मा. व्याज परतावा कर्ज | 0.91 | 2.14 | 2.40 | 1.17 | 28.57 |
| 20. | मंगलमुर्ती ठेव कर्ज | 0.18 | 0.52 | 0.57 | 0.23 | 27.78 |
| 21. | आवर्त ठेव कर्ज | 0.00 | 0.02 | 0.03 | 0.01 | 0.00 |
| 22. | महालक्ष्मी ठेव कर्ज | 0.22 | 0.84 | 1.07 | 0.45 | 104.55 |
| 23. | मासिक लखपती ठेव कर्ज | 0.02 | 0.11 | 0.13 | 0.04 | 100.00 |
| 24. | कॅश क्रेडीट कर्ज | 0.74 | 1.20 | 1.21 | 0.75 | 1.35 |
| 25. | वसंत पंचमी ठेव कर्ज | 0.07 | 0.18 | 0.24 | 0.13 | 85.71 |
| 26. | कॅश क्रेडीट ठेव तारण कर्ज | 0.22 | 0.66 | 0.75 | 0.31 | 40.91 |
| 27. | महिला बचतगट कर्ज | 5.17 | 3.84 | 1.90 | 3.23 | -37.52 |
| | एकूण | 130.55 | 67.84 | 98.99 | 161.70 | 23.86 |

**नफा विभागणी :**

संस्थेस सन 2017-2018 या वर्षात तरतुदी व खर्च वजा जाता ₹ 2,07,66,501.71 नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा ₹ 8,558.01 मिळूण एकूण ₹ 2,07,75,059.72 नफा झालेला आहे. त्याची विभागणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे. त्यास मान्यता मिळावी.

| | |
|---|---|
| राखीव निधी 25% (Reserve Fund) | ₹ 51,93,765.00 |
| लाभांश 10% (Dividend) | ₹ 80,78,536.00 |
| इमारत निधी (Building Fund) | ₹ 63,50,000.00 |
| धर्मादाय निधी (Charity Fund) | ₹ 1,25,000.00 |
| शिक्षण उत्तेजनार्थ निधी (Education Dev. Fund) | ₹ 1,50,000.00 |
| सभासद कल्याण निधी (Member Welfare Fund) | ₹ 3,25,000.00 |
| लाभांश समिकरण निधी (Dividend Equilasation Fund) | ₹ 4,50,000.00 |
| क्रिडा व सांस्कृतिक निधी (Sports & Activity Fund) | ₹ 75,000.00 |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक (Next Year Balance) | ₹ 27,758.72 |
| एकूण (TOTAL) | ₹ 2,07,75,059.72 |



# हार्दिक अभिनंदन !



1) संस्थेचे अध्यक्ष **श्री. आनंदराव माईंगडे** यांची मुंबई सहकारी बोर्डाच्या संचालक म्हणून निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने **हार्दिक अभिनंदन !**
2) दत्तसेवा विद्यालय तुरुकवाडी इ. ८ वी स्कॉलरशिप परिक्षेत **कु. श्रेयस तानाजी पाटील** (जिल्ह्यात १२१ वा क्र.) व **कु. चैत्राली तानाजी पाटील** (तालुक्यात ३ रा क्र.) प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या वतीने **हार्दिक अभिनंदन !**
3) **कु. सागर निवृत्ती पाटील (कोतोली)** यांची पोलीस उपनिरिक्षक पदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने **हार्दिक अभिनंदन !**
4) दत्तसेवा परिवार संचलित दत्तसेवा विद्यालय, तुरुकवाडी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर येथील इ. १२ वी चा निकाल १००% व इ. १० वी चा निकाल ९८% लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने **हार्दिक अभिनंदन !**
5) संस्थेचे हितचिंतक **श्री. बाळकृष्ण पाटील यांची पुतणी कु. प्रमिला अशोक पाटील** हिने शिष्यवृत्ती परिक्षेत राज्यात ग्रामीण विभागात तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या वतीने **हार्दिक अभिनंदन !**

**संचालक मंडळ/कर्मचारी वृंद**



30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे दिपप्रज्वलन व उद्घाटन प्रसंगी संस्थेचे संचालक व कर्मचारी वृंद.



30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी उपस्थित असलेले सभासद.



30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे व मा. श्री. विश्वासराव पाटील (माजी संचालक, सांगली सहकारी बँक).



सन 2016/17 सालचा प्रथम क्रमांक ... चषक मा. श्री. लक्ष्मणराव पाटील (संचालक महाराष्ट्र ... फेडरेशन), मा. श्री. सदाशिव मते (उपाध्यक्ष, मनसे) ... हस्ते स्विकारताना जोगेश्वरी पुर्व शाखेचे कर्मचारी ... व प्रतिनिधी.



मा. श्री. जे. डी. पाटील (उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग) यांनी संस्थेच्या प्रधान कार्यालयात भेट दिली असता त्यांचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्यव्यवस्थापक व मा. श्री. बाळ पाटील (अध्यक्ष विशालदिप पतपेढी).




30 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे सोबत मा. श्री. वसंतराव शिंदे (संचालक, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन) व इतर संचालक.

# दत्तसेवा
## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई



पतसंस्था संचालक, कर्मचारी यांच्या अलिबाग येथील प्रशिक्षण कार्यक्रमात मा. शेखर चरेगांवकर (राज्यमंत्री दर्जा) यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे सोबत मा. श्री. वसंतराव शिंदे (संस्थापक संचालक म.रा.प.फे., पुणे)



वसंतराव भागवत विद्यालय व डॉ. शांताराम कारडे फॅन्स फाऊंडेशनच्या वतीने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल मा. स्वामी अग्निवेश माजी. शिक्षण मंत्री हरियाणा यांच्या हस्ते सन्मानपत्र स्विकारताना संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे



महाराष्ट्र शासन सहकार विभाग व उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग व संस्थेच्या वतीने आयोजित आक्सा गांव मालाड (प.) येथे वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व जे. डी. पाटील (उपनिबंधक), अधिकारी, ग्रामस्थ व विद्यार्थी.



संस्थेच्या वतीने मौजे तुरूकवाडी (कोल्हापूर) येथे प्युरिफायर पाण्याच्या मशिनचे लोकार्पण करताना ... अध्यक्ष, तुरूकवाडी गावचे सरपंच मा. श्री. गणपत कांब...




सन 2017 चा बँको पुरस्कार मा. आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे मुख्य व्यवस्थापक श्री. हरी पाटील व हिशेबनीस श्री. उदय लुगडे.



सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'जीवनाधार फाऊंडेशन, मुंबई' यांचे वतीने मुंबई सहकार भुषण पुरस्कार स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे सोबत सौ. अर्चना माईंगडे व इतर मान्यवर.

प्रेषक,

**दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई.**
1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी,
अग्निशमन केंद्रासमोर, मालाड पश्चिम, मुंबई - 95.
दुरध्वनी : 8108160113/8108160101
Email : dattasevapatpedhi@gmail.com
Website : www.dattaseva.com

सभासद क्र. ____________ बुक-पोस्ट

प्रति,
श्री./श्रीमती ____________________

____________________

____________________

युनिटी प्रिंटींग प्रेस - २३७०१९५१ / ९८२०४६०३१४ / ९८२०६१३०८५ Email : unityppnikam@gmail.com